# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६०१२६४
२५६०१२६५
ई—मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे—४११००७.

संदर्भ : साफुपुवि/निववि/५७९ दिनांक : १९/०९/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय** : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत अनुदानासाठी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांच्या छापिल प्रती सादर करण्यासाठीच्या मुदतवाढीबाबत...

महोदय/महोदया,

वरील विषयी कळविण्यात येते की, विद्यापीठाचे संदर्भ पत्र क्र. साफुपुवि/निवनि/ ५१३ दि. २४.८.२०१९ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत चर्चासत्र/परिषदा/कार्यशाळा आयोजन, कार्यालयीन/शैक्षणिक/प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तू खरेदी, क्रीडा साहित्य, बांधकाम व आदिवासी विभागातील महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांकरिता गरजेवरती आधारित उपकरणे इत्यादिंकरिता अर्थसहाय्यासाठी दि. २४.८.२०१९ ते १४.९.२०१९ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात आले होते. सदर ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांच्या छापिल प्रती आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठ कार्यालयात सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक १८.९.२०१९ पर्यंत देण्यात आली होती.

ज्या संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत अनुदानासाठी ऑनलाईन पध्दतीने विहित मुदतीत अर्ज सादर केलेले आहेत, परंतु दि. १८.९.२०१९ पर्यंत उक्त अर्जाच्या छापिल प्रती आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठ कार्यालयाकडे सादर केलेल्या नाहीत, त्यांच्यासाठी **विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केलेल्या प्रस्तावांच्या छापिल प्रती आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठ कार्यालयात सादर करण्यास दि. २०.९.२०१९ रोजी, सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. यानंतर कोणत्याही सबबीवर मुदतवाढ देण्यातयेणार नाही**, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

19/9/19

(मुंजाजी. वि. रासवे),
उपकुलसचिव,
नियोजन व विकास विभाग

D:\Bhosale 2019\Circulars..Letters.docx